# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक ०६.०९.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०५.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण १४,६०१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसमध्ये ११ इसमांवर कारवाई करून एकुण ५८,७०५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,९५१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ८,५१,५५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०५.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०६.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०४ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गिट्टीखदान पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.०९.२०२६ चे १६.४५ वा. ते १८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथील पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीता असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत गली क्र. १, बुध्दविहारजवळ, भिमसेना नगर, भिवसनखोरी येथे राहणारा नेहाल रवि उके वय २६ वर्ष याचे राहते घरी त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्यांचे ताब्यातुन दोन झिपलॉक पन्नीत एकुण ३.६२ ग्रॅम एमडी पावडर कि. १०,८६०/— रु. ची मिळुन आल्याने जप्त करण्यात आली. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एमडी पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. श्री. सत्यवीर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सारंग मिराशी, पोनि. देवा नरोटे, पोउपनि. खुशाल राठोड, पोअं. नितीन रंगारी, घनश्याम निलेश व मपोअं. अश्विनी आंबोले यांनी केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०६.०९.२०२६ चे ०४.०५ वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, आठवा मैल, रामजी आंबेडकर नगर, त्रिरत्न बुध्द विहारजवळ राहणारा हद्दपार इसम त्याचे घरी आलेला आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, हद्दपार इसम हा त्याचे राहते घरी मिळून आला. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नरेंद्र उर्फ नारु रामखिलावन पांडे वय ३६ वर्षे असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७३८/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष राहते घरी मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कळमणा :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०६.०९.२०२६ चे ०१.१५ वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, जय भोले भोजनालय समोर, कळमणा मार्केट बाहेरील रोड येथे एक इसम हातात शस्त्र घेवून लोकाना शिवीगाळ करुन धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम हा हातात लोखंडी चाकु घेऊन धुमाकुळ घालतांना दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव बहुरदास उर्फ दादु अशोक जांगडे वय २३ वर्षे रा. गली क्र. १५, पाच झोपडा, मिनी माता नगर, कळमणा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे अजनी :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी राजेंद्रकुमार हिरालाल परदेशी वय ५८ वर्षे, रा. मुंबई हे रेल्वे रिक्रुटमेंट सेल, मध्य रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी असुन रेल्वे विभागातर्फे वर्ग 'ड' ची पदभरती सुरु असुन त्याची शारीरीक पात्रता परिक्षा पोलीस ठाणे अजनी हद्दीत रेल्वे स्टेडीयम ग्राऊंड अजनी येथे सुरु होती. दिनांक ०१.०६.२०२६ चे ०६.०० ते दिनांक ०५.०९.२०२६ वे २२.३० वा. चे दरम्यान, पात्रता परिक्षेचा उमेदवार नामे अंकित रामदास तिवारी वय २१ वर्ष रा. बागदा, जि. आगरा, उत्तरप्रदेश याचे नावावर शिवम हरीकिशन यादव वय २६ वर्ष रा. सलपुर ता. शिकोहाबाद, उत्तरप्रदेश याने तो अंकित रामदास तिवारी असल्याचे भासवून, बनावट कागदपत्राचे आधारे परिक्षा देण्यास आला व त्याने परिक्षा दिली. तसेच उमेदवार राहुलकुमार शिवलाल मिना वय ३६ वर्ष रा. बिरगाव ता. मांडेवार, दौसा, राजस्थान याने तो बुधाराम श्रीराम मिना वय २७ वर्ष रा. बैजुपारा, दौसा, राजस्थान हा असल्याचे भासवून त्यानेसुदधा बनावट कागदपत्राचे आधारे परिक्षा दिली. चारही आरोपी यांनी संगनमताने बनावटपणा करुन रेल्वे प्रशासनाची फसवणुक केली असे कागदपत्रे पडताळणी दरम्यान रेल्वे प्रशासनाचे निदर्शनास आल्याने याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. पकंज काकडे

८२७५३९२८१० यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४),३१९,६१(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे कोराडी</u> :—** दिनांक ०२.०९.२०२६ चे १३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत सुंदर बिस्कीट कंपनीचे आत, इसम नामे बालकिशन कपुरचंद मरकाम वय ४३ वर्ष रा. स्मृती नगर, प्लॉट क्र. २०८, कोराडी, नागपुर हे आयशर गाडीमध्ये माल भरत असतांना, त्यांचा तोल जावुन ते जमिनीवर खाली पडल्याने डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाले. त्यांचे सोबत काम करणारे यांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल व तेथून मेडीकल हॉस्पिटल, ट्रॉमा सेंटर येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ०५.०९.२०२६ चे २३. ५० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. महेंद्र मिश्रा ८९९९९६७८२९ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**